# जनसंपर्क अधिकारी

पोलीस आयुक्त, मिरा-भाईंदर, वसई-विरार यांचे
कार्यालय रामनगर सृष्टी, मिरारोड पुर्व, जि. ठाणे
दुरध्वनी क्र. ०२२-२९४५१००१
E-mail: pro.cp.mb-vv@mahapolice.gov.in


प्रेस नोट क्र-१३१ दिनांक - ०३/०४/२०२४

## हत्या करुन ३६ वर्षापासुन फरार असलेला आरोपी अटक करण्यात माणिकपुर पोलीस ठाण्यास यश

दिनांक ३०/११/१९८८ रोजी १९.०० ते १९.३० वा.चे दरम्यान नवघर पुर्वेस सलीम अकबर अली यास इसमास आरोपीत नामे १) विजय सुदाम राणे २) शंकर बंगाळी माखन ३) धर्मा धमेंद्र ४) शेखर पुजारी ५) चंद्रशेखर शेट्टी ६) कुमार होडे ७) धनंजय बोलूर ८) मुन्ना क्लेमेंट सायमन लोबो अशांनी आपसात संगनमत करुन तीक्ष्ण हत्याराने वार करुन जिवे ठार मारले होते. म्हणून वसई पोलीस स्टेशन येथे गु.र.न. ५०३/१९८८ भा.द.वि.क ३०२, ३४ प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता. सदर गुन्हयात आरोपी क्र. १ ते ६ यांना अटक करण्यात आली होती. परंतू आरोपी क्र. ८ मुन्ना क्लेमेंट सायमन लोबो हा गुन्हा घडल्यापासून फरार असून आपले असत्तिव लपवत असल्याने तो पाहिजे आरोपींच्या यादी मध्ये होता.

मा. पोलीस उप आयुक्त, परीमंडळ २ यांनी विशेष मोहीम राबवुन पाहिजे व फरार आरोपींचा शोध घेवुन अटक करण्याबाबत सुचना व मार्गदर्शन केले होते.

मा. वरीष्ठांच्या मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे माणिकपुर पोलीस ठाणेचे वरीष्ठ पोलीस निरीक्षक राजू माने तसेच दहशतवाद पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद वाघ यांनी तांत्रिक विश्लेषणाद्वारे व गुप्त बातमीदारांकडुन प्राप्त माहीतीचे आधारे आरोपी नामे क्लेमेंट सायमन लोबो ऊर्फ मुन्ना वय ५५ वर्षे, पेंन्शनर रा. रुम न. १०२, इम्मा व्हिला, वाय.एम.सी. ग्राऊंडच्या पाठीमागे, माणिकपूर तलखल वसई प. ता. पालघर यास त्याचे राहते परीसरातून ताब्यात घेतले. त्याच्याकडे अधिक तपास केला असता मयत इसम नामे सलीम अकबर अली याचे व पाहिजे आरोपी क्लेमेंट सायमन लोबो ऊर्फ मुन्ना यांचे मध्ये पुर्वी वाद होते व त्या वादाचे कारणावरुन त्याचा खुन करुन तो मागील ३६ वर्षापासुन परदेशात वास्तव्य करुन त्यानंतर तो वसई येथे आपले अस्तित्व लपवुन राहत असल्याचे निष्पन्न झाले आहे.

सदरची कारवाई श्रीमती पौर्णिमा चौगुले-श्रींगी, पोलीस उप आयुक्त, परिमंडळ-२, श्रीमती पद्मजा बडे, सहाय्यक पोलीस आयुक्त, वसई विभाग यांचे मागदर्शनाखाली श्री. राजू माने, वरिष्ठ पोलीस निरीक्षक तसेच दहशतवाद पथकाचे पोलीस उपनिरीक्षक विनोद वाघ, पोहवा/अव्हाड, पो.ह. प्रशांत पाटील यांनी केली आहे.

----0000----